प्रेस नोट दिनांक २४/०८/२०१८

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. आनंदा नानासो थोरात, वय ४८ वर्षे, नोकरी- मुळ पद मेस्त्री,( वरीष्ठांच्या आदेशान्वये आवक जावक लिपीक किंवा इतर कार्यालयीन कामे) बांधकाम विभाग, नगरपरीषद रत्नागिरी ता.जि. रत्नागिरी |
| कार्यालय | बांधकाम विभाग, नगरपरीषद रत्नागिरी ता.जि. रत्नागिरी |
| लाच स्विकारल्याचे ठिकाण | गोपाळ हॉटेलच्या बाहेरील पाय-यालगत मोकळया जागेत, मारुतीमंदीर येथे ता.जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | १२,०००/-रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रु. |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे रत्नागिरी शहरामधील घर हे सीआरझेड मध्ये येत असल्याने घराची बांधकामाची परवानगी मिळणेकरीता त्यांनी बांधकाम विभाग, नगरपरीषद रत्नागिरी येथे कार्यरत लोकसेवक आनंदा थोरात यांचेकडे प्रस्ताव दिला होता. लोकसेवक आनंदा थोरात यांनी तक्रारदार यांचे घराचे बांधकामाचे परवानगीचा प्रस्ताव लवकरात लवकर पुढे पाठविणेसाठी १२,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी असीबी कार्यालय रत्नागिरी येथे दिनांक १६/०८/२०१८ रोजी तक्रारी अर्ज दिला होता. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/०८/२०१८ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता लोकसेवक थोरात यांनी घराचे परवानगीचा प्रस्ताव लवकारात लवकर पुढे पाठविणेकरीता ५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी करुन दिनांक २४/०८/२०१८ रोजी घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्याअनुषंगाने आज दिनांक २४/०८/२०१८ रोजी सापळा आयेजित करुन लोकसेवक थोरात यांना आज दुपारी १२.४० वाजता गोपाळ हॉटेलचे बाहेरील पाय-यालगत मोकळया जागेत मारुतीमंदीर, रत्नागिरी येथे पंचासमक्ष लाच रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893
**Office email** :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau, सत्यमेव जयते, RATNAGIRI

24/8/2018
(राजेंद्र रानमाळे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,रत्नागिरी